


# साप्ताहिक किंमत सनियंत्रण अहवाल

## २३.०६.२०२५

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषी**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषीव्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)


The World Bank assisted project: State of Maharashtra Agribusiness & Rural Transformation (SMART)


## १. **मका** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtI)


# मका साप्ताहिक किंमती

## दि. २२ जून २०२५ अखेर : ₹ १९७० / क्विंटल







- मागील आठवड्यात नांदगाव बाजारात मक्याची किंमत रु. १९७० प्रती क्विंटल होती.
- मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये घट झाली आहे.
- खरीप हंगाम २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत रु. २४०० प्रती क्विंटल जाहीर करण्यात आली आहे.
- सध्या मक्याच्या किंमती MSP (२०२४-२५) पेक्षा कमी आहेत.
- मागील आठवड्याच्या तुलनेत मक्याच्या आवक मध्ये राष्ट्रीय पातळीवर ४४.५८ % इतकी वाढ झाली आहे व राज्य पातळीवर ५५.९० % इतकी घट झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमळनेर बाजारात मक्याची सरासरी किंमत सर्वाधिक रु. २१६४/ क्विंटल होती, तर छ. संभाजीनगर बाजारात सर्वात कमी किंमत रु. १९३८/ क्विंटल होती.


**Source : Agmarknet**


२. **हरभरा** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)

# हरभऱ्याच्या साप्ताहिक किंमती

## दि. २२ जुन २०२५ अखेर: रु. ५४८८/क्विंटल




मागील आठवड्यात लातूर बाजारात हरभऱ्याची सरासरी किंमत रु. ५४८८ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत हरभऱ्याच्या किंमती ०.७% वाढ झाल्याचे दिसून येत आहे.


रबी हंगाम २०२४-२५ साठी हरभऱ्याची किमान आधारभूत किंमत रु. ५६५० प्रति क्विं. आहे


मागील आठवड्याच्या तुलतेन राष्ट्रीय पातळीवर हरभऱ्याच्या आवकेमध्ये ७% घट झालेली दिसून येत आहे.


मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी उद्गीर बाजारात हरभऱ्याच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ५७०८/क्विंटल.) तर खामगाव बाजारात सरासरी किंमती कमी होत्या. (रु.४८८८/क्विंटल).

## ३. तूर (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtI)

# तुरीच्या साप्ताहिक किंमती
## दि.२२ जून २०२५ अखेर: रु. ६५५०/क्विंटल




मागील आठवड्यात लातूर बाजारात तुरीच्या सरासरी किंमती रु. ६५५० प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीत १.७ % नी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

सध्याच्या किंमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत. तुरीचा खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु. ७५५० प्रति क्विं. आहे. तसेच खरीप हंगाम २०२५-२६ साठी रु.८००० प्रती क्विटल जाहीर करण्यात आलेली आहे.


मागील आठवड्याच्या तुलतेन राष्ट्रीय पातळीवर तुरीच्या आवकेमध्ये २३ % वाढ झालेली दिसून येत आहे.


मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अकोला बाजारात तुरीच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ६५७० /क्विंटल.) तर खामगाव बाजारात सरासरी किंमती कमी होत्या (रु. ५८५७/क्विंटल).


४. **सोयाबीन** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → **https://shorturl.at/yVdtl**)

## सोयाबीन साप्ताहिक किंमती
## दि. २२ जून २०२५ अखेर : रु. ४२८८ प्रती क्विंटल






– मागील आठवड्यात लातूर बाजारात सोयाबीनची सरासरी किंमत रु. ४२८८ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीत ३.७ % वाढ झाली आहे.

– सोयाबीनची खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु.४८९२ प्रती क्विटल आहे. खरीप हंगाम २०२५-२६ साठी रु.५३२८ प्रती क्विटल जाहीर करण्यात आलेली आहे. सध्या लातूर बाजारात सोयाबीनच्या किंमती या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत.

मागील आठवड्याच्या तुलनेत सोयाबींनच्या आवकमध्ये राष्ट्रीय पातळीवर ४ टक्क्यांनी घट झाली आहे.

मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी वाशीम बाजारात सोयाबीनच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ४७६३/क्विंटल.) तर इंदोर (म.प्र.) बाजारात सरासरी किंमती कमी होत्या (रु. ४१५६/क्विंटल).


Source: Agmarknet


## ५. कापूस (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)

### कापसाच्या साप्ताहिक किंमती


### दि. २२ जून २०२५ अखेर : रु. ७,७५८ /- क्विंटल






- कापसाच्या राजकोट बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. ७७५८ प्रती क्विंटल होत्या.
- या आठवड्यातील कापसाच्या किंमतीमध्ये मागील आठवड्याच्या तुलनेत ०.२० टक्के वाढ झाली आहे.
- सध्या कापसाच्या किंमती MSP (२०२४-२५) पेक्षा जास्त आहेत.
- खरीप हंगाम २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत रु. ७७१० (मध्यम धागा) प्रती क्विंटल जाहीर करण्यात आली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत कापसाच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे २३.१८ % व २.६० % इतकी घट झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अकोट (अकोला) बाजारात कापसाच्या सरासरी किंमत सर्वाधिक रु. ८१५० / क्विंटल होती, तर कळमेश्वर (नागपूर) बाजारात सर्वात कमी किंमत रु. ७३०० / क्विंटल होती.





Source - Agmarknet


## ६. कांदा (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)


# कांदाच्या साप्ताहिक किमती

दि. २२ जुन २०२५ अखेर: रु. १५८२ /-क्विंटल






-कांद्याची लासलगाव बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. १५८२ प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतींत १ टक्केनी घट झाली आहे.

-देशपातळीवर कांद्याच्या आवकमध्ये मागील आठवड्याच्या तुलनेत २% नी वाढ झाली आहे.

-मागील आठवड्यात पिंपळगाव बाजारात कांद्याच्या किंमती ( रु. १५८३/क्वि.) सर्वाधिक होत्या, तर सोलापुर बाजारात कांद्याच्या किंमती रु. १०००/क्वि. इतक्या होत्या.


Source: Agmarkent


७. **टोमॅटो** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)


# टोमॅटो साप्ताहिक किंमती

दि. २२ जून २०२५ अखेर : रु. १५८०/क्विंटल






– टोमॅटोच्या पुणे बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. १५८० प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीमध्ये ४ टक्केनी घट झाली आहे.

– देशपातळीवर मागील आठवड्याच्या तुलनेत टोमॅटोच्या आवक मध्ये १३.७ टक्केनी वाढ झाली आहे.

– प्रमुख APMC बाजारापैकी मुंबई बाजारात सर्वाधिक किंमती ( रु. १८४०/क्वि.) होत्या तर सोलापूर बाजारात सर्वात कमी किंमती ( रु. १०००/ क्वि.) होत्या.


Source: Agmarknet


८. **हळद** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)


## हळदीच्या साप्ताहिक किंमती

## दि. २२ जून २०२५ अखेर : ₹. ११,६९० / क्विंटल






- मागील आठवड्यात हिंगोली बाजारात हळदीची किंमत रु. ११६९० प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये घट झाली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत हळदीच्या आवक मध्ये राष्ट्रीय पातळीवर २.३३ % इतकी वाढ झाली आहे व राज्य पातळीवर १.१२ % इतकी वाढ झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी सांगली बाजारात हळदीची सरासरी किंमत सर्वाधिक रु. १२७६३ / क्विंटल होती, तर वाशिम बाजारात सर्वात कमी किंमत रु. १११५० / क्विंटल होती.
- २०२४ ते २०३१ या अंदाज कालावधीत जागतिक हळदीची बाजारपेठ लक्षणीय दराने वाढण्याची अपेक्षा आहे.
- सन २०२३-२४ मध्ये हळदीचे लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन यामध्ये महाराष्ट्र राज्य भारतामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे.
- महाराष्ट्रात सांगली, हिंगोली, नांदेड, परभणी, वाशीम हे हळदीची लागवड करणारे प्रमुख जिल्हे आहेत.

(स्रोत - हळद आउटलुक - अहवाल)

**Source - Agmarknet**

(माहिती स्रोत: AGMARKNET व कृषी मंत्रालय, भारत सरकार)

**हा QR कोड स्कॅन करून**

**व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा**

**लिंक - https://shorturl.at/yVdtI**

---


अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष**

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,

सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे- ४११०१६

**फोन** : **020-25656577**, **टोल फ्री क्रमांक**: **1800-210-1770**

**ई-मेल** : market.intelligence.smart@gmail.com

**वेबसाईट :** smart-mh.org